दावा दाखल तारीख २३/०१/२०२५
दावा नोंद दिनांक २३/०१/२०२५
निकाल दिनांक २८/०४/२०२६
कालावधी वर्ष ०१, महिना ०३ दिवस ०५

**<u>न्यायाधीश, सहकार न्यायालय, जळगांव यांचे न्यायालयात</u>**
**(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)**

**दावा क्रमांक डी/३०/२०२५**
**निशाणी क्र.४१**

१) जळगांव जिल्हा प्राथमिक शिक्षकांची
सहकारी पतपेढी मर्यादित पारोळा.
ता.पारोळा जि.जळगांव ... **वादी**

**विरूद्ध**

१) धनसिंग नारायण परदेशी
रा.जिल्हा परिषद शाळा, अंतुर्ली, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव.

२) संजय अनंत सोनार
रा.साईनगर, शिक्षक कॉलनी, जि.जळगांव.

३) श्री.कैलास कपुरचंद पवार
रा.जिल्हा परिषद शाळा, देव्हारी,
ता.जि.जळगांव ... **जाब देणार**

वादीतर्फे वकील : प्रविण आय.पाटील
जाब देणार क्र.१ ते ३ तर्फे : एकतर्फा

**<u>न्यायनिर्णय</u>**
**(दिनांक २८/०४/२०२६)**

१) प्रस्तुत वाद रक्कम रू.६,३७,५९४/— च्या वसुलीसाठी आहे.

SP 28/4/26

२) वादीचे असे कथन आहे की, ती महाराष्ट्र सहकारी संस्था जाब देणार क्र.१ ते ३ हे तिचे सभासद आहेत. जाब देणार क्र.१ ने वादीकडे जामीन कर्ज मागणीसाठी केलेल्या अर्जावरून वादीने त्यास दि.२२.१०.२०२० रोजी रक्कम रू.२,८०,०००/— इतके जामिनकी कर्ज अदा केले. सदर कर्जासाठी प्रतिवर्षी १२ टक्के असा व्याजदर ठरला होता. जाब देणार क्र.१ ते ३ ने वादीकडे विशेष कर्ज मागणीसाठी केलेल्या अर्जावरून वादीने त्यास दि.२६.११.२०२० रोजी रक्कम रू.३,५०,०००/— इतके कर्ज अदा केले. सदर कर्जासाठी प्रतिवर्षी १२.५ टकके व्याज ठरला होता. जाब देणार क्र.२ व ३ यांनी सदर कर्जासाठी जामीनकी स्विकारली आणि सर्व जाब देणारांनी प्रतिज्ञापत्र, कर्जरोखा, वचनचिठ्ठी वगैरे कागदपत्रे सदर कर्जासाठी लिहून दिली. सदर कर्जाची ठरलेल्या मुदतीत परतफेड करण्याचे ठरले होते. मात्र जाब देणारांनी सदर कर्जाची परतफेड करण्याचे ठरले होते. मात्र जाब देणारांनी सदर कर्जाची परतफेड मुदतीत केली नाही. जामीन कर्ज आणि विशेष कर्ज तसेच त्यांवरील व्याज अशी एकूण रक्कम रू.६,३७,५९४/— व पुढील व्याज जामिनकी कर्जासाठी प्रतिवर्षी १५ टक्के आणि विशेष कर्जासाठी प्रतिवर्षी १५.५० टक्के दराने वसुलीसाठी वादीस प्रस्तुत वाद दाखल करणे भाग पडले.

३) जाब देणार क्र.१ ते ३ हे याकामी हजर होऊन देखील त्यांनी कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे त्यांचे विरूद्ध प्रस्तुत वादाचे कामकाज विना कैफियत चालण्याचा आदेश न्यायालयाने दि.०९.०२.२०२६ रोजी केला आहे.

४) वादपत्राचे अवलोकन करता माझे विचाराधीन मुद्दे व त्यांचेवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे—

28/4/26

| अ.क्र. | विचाराधीन मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने वाद मागणी सिद्ध केली काय? | अशंतः होकारार्थी |
| २. | अंतिम आदेश व निवाडा काय? | वाद अंशतः मंजूर |

**कारणमिमांसा**

५) **विचाराधीन मुद्दा क्र.१ करिताः** वादीने त्याचा माहितीगार इसम प्रविण जगन्नाथ सोनवणे याचा सरतपास नि.१९ तसेच ठराव नि.३८ येथे नोंदविला आहे. जामिनकी कर्ज मागणीचा अर्ज नि.२२, कर्ज रोख्याचा नमुना नि.२३, करारनामा नि.२४ व २७, वचनचिठ्ठी नि.२८, विशेष कर्ज मागणीचा अर्ज नि. २९, विशेष कर्जाचा कर्ज रोख्याचा नमुना नि.२९अ, करारनामा नि.३० व ३१, वचनचिठ्ठी नि.३४, एकत्रित खातेउतारा नि.३७ अशी कागदपत्रे वादीने दाखल केली आहेत. कर्ज कागदपत्रांवर कर्जदार आणि जामिनदार यांच्या सह्या असलेचे वादीच्या साक्षीदाराने सांगितले आहे.

६) वादीच्या पुराव्यास कोणतीही हरकत आली नसल्याने तो खोडून काढला गेलेला नाही. सबब, तो पुराव्यात वाचण्यात येत आहे. त्यावरून असे स्पष्ट होते की, दि.२२.१०.२०२० रोजी वादीने जाब देणार क्र.१ ला रक्कम रू.२,८०,०००/— इतके जामिनकी कर्ज प्रतीवर्षी १२ टक्के व्याजदराने आणि दि.२६.११.२०२० रोजी रक्कम रू.३,५०,०००/— इतके विशेष कर्ज प्रतिवर्षी १२.५० टकके दराने दिले. सदर कर्जास जाब देणार क्र.२ व ३ हे जामीन राहिले. खातेउतारा असे दर्शवितो की, दि.३०.०९.२०२४ रोजी वादीस जामिन कर्ज रु.२,५६,८००/—, जामिन व्याज रू.२५,१७८ विशेष कर्ज रू.२,७२,४००/—, विशेष व्याज रू.८३,२१६/— अशी एकूण रक्कम रू.६,३७,५९४/— येणे आहे.

28/4/26

७) खातेउतारा कराराप्रमाणेच ठेवलेला दिसतो.

८) यावरुन मी अशा निष्कर्षास आले आहे की, दि.३०.०९.२०२४ रोजी वादीस जामिन कर्ज रु.२,५६,८००/—, जामिन व्याज रू.२५,१७८ विशेष कर्ज रू.२,७२,४००/—, विशेष व्याज रू.८३,२१६/— अशी एकूण रक्कम रू.६,३७,५९४/— येणे आहे.

९) येणे बाकी मुद्दल रकमेवर पुढील व्याज कराराप्रमाणे जामिनकर्जास प्रतिवर्षी १२ टक्के दराने आणि विशेष कर्जास प्रतिवर्षी १२.५० टक्के दराने मंजूर करणेत येत आहे.

परिणामी विचाराधीन मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी येतो.

उपरोक्त विवेचनावरून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१) प्रस्तुत वाद खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जाब देणार क्र.१ ते ३ यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वादीस रू.६,३७,५९४/— द्यावेत व संपूर्ण रक्कमेची परतफेड होईपर्यंत दि.०१.०४.२०२३ पासून जामिनकर्ज मुद्दल रक्कम रु.२,५६,८००/— वर प्रतिवर्षी १२ टक्के दराने होणारे सरळ व्याज द्यावे आणि विशेष कर्ज मुद्दल रक्कम रू.२,७२,४००/— वर प्रतिवर्षी १२.५ टक्के दराने होणारे सरळ व्याज दयावे.

३) येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

28/4/26

**ठिकाण : जळगांव**

**एस.एस.पोरे**

**न्यायाधीश,**

**दिनांक : २८/०४/२०२६**

**सहकार न्यायालय, जळगांव**

दावा दाखल तारीख २३/०१/२०२५
दावा नोंद दिनांक २३/०१/२०२५
निकाल दिनांक २८/०४/२०२६
कालावधी वर्ष ०१, महिना ०३ दिवस ०५

**न्यायाधीश, सहकार न्यायालय, जळगांव यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी एस.एस.पोरे)**

**दावा क्रमांक डी/३०/२०२५**
**निशाणी क्र.४२**

१) जळगांव जिल्हा प्राथमिक शिक्षकांची
सहकारी पतपेढी मर्यादित पारोळा.
ता.पारोळा जि.जळगांव ... **वादी**

**विरूद्ध**

१) धनसिंग नारायण परदेशी
रा.जिल्हा परिषद शाळा, अंतुर्ली, ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव.

२) संजय अनंत सोनार
रा.साईनगर, शिक्षक कॉलनी, जि.जळगांव.

३) श्री.कैलास कपुरचंद पवार
रा.जिल्हा परिषद शाळा, देव्हारी,
ता.जि.जळगांव ... **जाब देणार**

वादीतर्फे वकील : प्रविण आय.पाटील
जाब देणार क्र.१ ते ३ तर्फे : एकतर्फा

**हुकुमनामा**
**(दिनांक २८/०४/२०२६)**

दिनांक २३/०१/२०२५ रोजी दाखल केलेल्या वरील वादाचा दिनांक २८/०४/२०२६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम

28/4/26

९६ अन्वये दिलेल्या निकालाप्रमाणे प्रस्तुत वाद खालीलप्रमाणे निकाली करणेत येत आहे.

१) प्रस्तुत वाद खर्चासह अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) जाब देणार क्र.१ ते ३ यांना आदेश देणेत येतो की, त्यांनी संयुक्तिक व वैयक्तिकरित्या वादीस रू.६,३७,५९४/—द्यावेत व संपूर्ण रक्कमेची परतफेड होईपर्यंत दि.०१.०४.२०२३ पासून जामिनकर्ज मुद्दल रक्कम रु.२,५६,८००/— वर प्रतिवर्षी १२ टक्के दराने होणारे सरळ व्याज द्यावे आणि विशेष कर्ज मुद्दल रक्कम रू.२,७२,४००/— वर प्रतिवर्षी १२.५ टक्के दराने होणारे सरळ व्याज दयावे.

शिवाय जाब देणारांनी तपशिलाप्रमाणे दावा खर्चाची रक्कम रू. ११,५३४/— वादीला द्यावी व स्वत:चा खर्च स्वत:सोसावा.

| अ.क्र. | खर्चाचा तपशील | वादी | जाब देणार |
|---|---|---|---|
| १ | कोर्ट फी स्टॅम्प | ६,७००/— | |
| २ | वकिल फी | ४,७२९/— | ४,७२९/— |
| ३ | सेवा शुल्क | १०५/ | |
| | एकूण रु. | ११,५३४/— | ४,७२९/— |

(एकूण अक्षरी रूपये अकरा हजार पाचशे चौतीस मात्र)

आज दि.२८.०४.२०२६ रोजी हा निवाडा माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

28/4/26

**एस.एस.पोरे**
**न्यायाधीश**
**सहकार न्यायालय, जळगांव**

**ठिकाण : जळगांव**

**दिनांक : २८/०४/२०२६**